अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. २९९१
दिनांक : ३/१/१८

पुणे शहरातील रस्ता/पदपथांवरील सर्वेक्षणात आढळून आलेल्या व संगणकीय नोंदणी झालेल्या फेरीवाल्यांचे योग्य त्या ठिकाणी पुर्नवसन करणेसाठी जागा निश्चिती करणे व त्यांचेकरीता आकारणी करण्याचे दैनंदिन शुल्क निश्चित करणेकामी मा. महापौर, पुणे म.न.पा. यांचे अध्यक्षेतेखाली ॲपिलेट कमिटी नेमण्यात आली होती. दि. २९/११/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता ॲपिलेट कमिटीची बैठक महापौर दालनात घेण्यात आली.

**सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.**

१) मा. सौ. मुक्ता टिळक, महापौर, पुणे महानगरपालिका
२) मा. डॉ. श्री. सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, पुणे महानगरपालिका
३)मा. श्री. मुरलीधर मोहोळ, अध्यक्ष, स्थायी समिती पुणे महानगरपालिका
४)मा. श्री. श्रीनाथ भिमाले, सभागृह नेते
५)मा. श्री. चेतन तुपे, विरोधी पक्ष नेते
६)मा. सौ. अश्विनी लांडगे, गटनेत्या ए.आय.एम.आय.एम.
७)मा. प्रमोदनाना भानगिरे, सभासद, पुणे महानगरपालिका
८)मा. कुणाल कुमार, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
९)मा. शीतल तेली-उगले, अति. महा. आयुक्त (ज), पुणे महानगरपालिका
१०) मा. प्रशांत वाघमारे, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका
११) मा. सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन)
१२) मा. माधव जगताप, उप आयुक्त (अतिक्रमण)

सदर बैठकीमध्ये सादर विषयपत्रामधील व इतर विषयावर सविस्तर चर्चा होऊन घेतलेल्या निर्णयांवर कार्यवाही करणेबाबत मा. महापौर पुणे म.न.पा यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले असून त्याची संपूर्ण कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

| अ.क्र. | विषय | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
| --- | --- | --- | --- |
| १ | दि. १४/०९/२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी दि. १४/९/२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीबाबत संक्षिप्तपणे माहिती दिली. शहरातील पथविक्रेत्यांचे पुर्नवसनाकरीता मागील बैठकीत मान्य केलेल्या नियोजित हॉकर्स झोनच्या एकुण २८८ जागांपैकी १९० जागांवर पुर्नवसन करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच त्यांचे सीएफसी (नागरी सेवा केंद्र) मार्फत परवाना शुल्क घेण्यात येणार आहेत. सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयामध्ये बैठका घेऊन जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. अतिक्रमण निर्मुलनाच्या कारवाईमध्ये जप्त करण्यात येणारा माल हा वर्गवारीनुसार टॅगींग करुन वेगवेगळा करण्यात येणार आहे. नो-हॉकर्स झोनमधील नोंदणीकृत फेरीवाला व्यवसायिकांचे पुर्नवसन करण्यात येत आहे. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या अतिक्रमणाला आळा बसणेसाठी एक मध्यवर्ती स्कॉड ठेवण्यात आलेत व १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये देखील स्वतंत्र स्कॉड ठेवण्यात आलेला आहे. पुर्नवसन करताना जागा निश्चिती व जागा हस्तांतरण करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचेकडे आहेत. मागिल बैठकीतील सूचनेवरुन जाहिर प्रकटन देऊन दि. ३०/११/२०१७ पर्यंत प्रलंबित बायोमेट्रीक सर्व्हेक्षणासाठी व तडजोड शुल्क आकारणीची परवानाधारकाचे प्रकरणी अर्ज मागविण्यात आलेले आहेत. | शहरामध्ये जे रस्ते व चौक नो-हॉकर्स म्हणून जाहिर करणेत आले आहेत, तेथे फेरीवाले असू नयेत, असे मा. विरोधी पक्ष नेते चेतन तुपे यांनी सुचविले. अ, ब व क श्रेणीतील हातगाडी/स्टॉलला कलर कोड ठरवुन त्यावर पुणे मनपाकडील परवान्यावरील क्यूआर कोड अंदाजे ९ इंच बाय ९ इंच मापाचे जागेत लावून स्टॉलला नंबर देण्यात यावेत, असे सर्वानुमते ठरले.<br>दि. ३०/११/१७ नंतर बायोमेट्रीक सर्व्हेक्षणासाठी येणारे अर्ज स्वीकारु नयेत असे मा. श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता यांनी बैठकीमध्ये सांगितले. जे हातगाडी/स्टॉल बऱ्याच कालावधीपासून बंद आहेत, त्यांचे चौकशी करण्यात येऊन त्यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्यात यावेत व त्यांचेवर कारवाया करण्यात येऊन स्टॉल/हातगाडी जप्त करणेत याव्यात असे सर्वानुमते ठरले.<br>फेरीवाला व्यवसायिकांनी व्यवसाय करताना व्यवसायाचे दर्शनी भागात सर्वांना सतत दिसेल असे ठिकाणी व्यवसाय साधनावर मोठ्या आकारात क्यूआर कोड न लावल्यास १०००/- रुपये दंड आकारण्यात यावा.<br>मगरपट्टा आयटी पार्क लगतचे ६ नवीन अनधिकृत स्टॉल टाकण्यात आलेले आहेत, ते काढणेबाबत मा. चेतन तुपे विरोधी पक्षनेते यांनी सुचविले.<br>तसेच कर्वेनगर येथे एक नवीन अनधिकृत टपरी निर्माण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झालेली आहे, ती काढणेबाबत मा. श्री. सिध्दार्थ धेंडे उपमहापौर यांनी सुचविले. |
| २ | नोंदणीकृत/अधिकृत परवानाधारक पथविक्रेत्यांचे नव्याने मान्य झालेल्या दैनंदिन शुल्काची दि.१/४/२०१४ पासून थकबाकीसह पुढील नियमित मासिक पध्दतीने परवाना शुल्काची वसुली करणेबाबत. | नोंदणीकृत/अधिकृत परवानाधारक यांना प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, प्रमाणपत्र देतानाच शहर फेरीवाला समितीचा ठराव दि. १/४/२०१४ पासून थकबाकीसह पुढील नियमित मासिक पध्दतीने नवीन मान्य परवाना शुल्काची वसुली करणेबाबत यापूर्वी ठराव झाल्याची माहिती देण्यात आली. दि. १/४/२०१४ पासून थकबाकीसह वसुली करण्यास सर्व मा. सभासदांनी विरोध केला. मा. चेतन तुपे, विरोधी पक्षनेते यांनी त्यांचे मत सुचविले की, शुल्क वाढवू नयेत, आजच्या चालू दरानेचे शुल्क आकारावेत. मा. उपमहापौर सिध्दार्थ धेंडे व विरोधी पक्ष नेते चेतन तुपे यांनी २०१७ पासून थकबाकी वसुल करण्यात यावी असे सुचविले.<br>तद्नंतर मा. महापौर व इतर सभासदांनी फेरीवाल्यांचे शुल्कासंबंधी मा. मुख्य सभेच्या ठराव दिनांकापासून शुल्क वसुली करावी असे सुचविले, त्यावर मा. महापालिका आयुक्त व मा. अतिरिक्त आयुक्त (ज) तसेच उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी नोंदणीकृत फेरीवाल्यांच्या मा. दैनंदिन शुल्काची मागील वसुली ठरावाचे मा. मुख्य सभेच्या ठराव कालावधीपासून म्हणजेच १ एप्रिल २०१६ पासून करावी व एकूण येणारी थकबाकी ही चार टप्प्यामध्ये सहा-सहा महिन्याच्या कालावधीनुसार विनादंड वसुल करावी. तसेच शहरातील पथविक्रेत्यांना मागील मुख्य सभेच्या ठरावानुसार जे मासिक परवाना शुल्क वसुल करण्यात येत होते, तो परवाना शुल्क | सणासुदीच्या काळात व सिझनचे वेळेस वेगवेगळे झोनिंग करण्यात येऊन व्यवसायिकांना सिझनल व्यवसायास परवाने देणेत येऊन त्यांना स्वतंत्र परवाना शुल्क आकारावेत. यासाठी शहरामध्ये झोन तयार करुन जागा निश्चित कराव्यात असा चर्चेत निर्णय झाला. तसेच दि. १एप्रिल २०१६ पासून (मा. मुख्यसभेच्या मान्यता ठराव दिनांकापासून) सर्व नोंदणीकृत पथ विक्रेत्यांची थकबाकी एकूण सहा महिने कालावधीच्या चार टप्प्यांमध्ये विनादंड वसुल करावी व माहे १ एप्रिल २०१८ पासून नियमित पध्दतीने दैनंदिन परवाना शुल्काची मासिक पध्दतीने वसुली करणेस, मागिल जुन्या ठरावातील तरतुदीनुसार थकबाकी परवाना शुल्कावर (सहा महिने थकबाकीकरीता १ महिन्याचे परवाना शुल्क दंडापोटी जादा आकारणे) दंड वसुल करण्याची कार्यवाही चालू ठेवावी व दर आकारणीबाबत मुख्य सभेचा ठराव क्र. ७० दिनांक २७/५/१९९६ व जुना परवाना शुल्काचा मा. मुख्य सभेचा ठराव रद्द झालेला आहे असे बैठकीमध्ये ठरले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आकारणीचा ठराव निरस्त समजण्यात येऊन नवीन ठरावाचे मान्य दरानेच परवाना शुल्काची वसुली करण्यात येईल. परंतू पूर्वीच्या ठरावामधील परवानाशुल्काच्या थकबाकी पोटी दंड आकारणीची (सहा महिने थकबाकीकरीता १ महिन्याचे परवाना शुल्क दंडापोटी जादा आकारणे) पध्दती परवाना शुल्काच्या थकबाकीदाराकरीता या पुढे देखील चालू ठेवण्यात यावी, असे सुचविले. | |
| ३ | शहरातील शासकीय दूध केंद्रांचे ६ फूट बाय ८ फूट मापाचे स्टॉल व शहरातील मान्य रस-गुऱ्हाळ साईज १० फूट बाय १० फूट यांचे नवीन धोरणा अंतर्गत मे. सर्वोच्च न्यायालयानेदिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार मा. शहर फेरीवाला समितीच्या दि.६/२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत नव्याने मान्य केलेली साईज २ मीटर बाय १ मीटर मध्ये रुपांतर करणेस व मान्य दरानुसार दैनंदिन शुल्काची इतर व्यवसायिकानुसार<br>दि. १/४/२०१४ पासून थकबाकीसह नियमित परवाना शुल्काची वसुली करणेस. | शासकीय दूध केंद्रांचे स्टॉल ६ फूट बाय ८ फूट व रस-गुऱ्हाळ १० फूट बाय १० फूट या पूर्वीच्या आकारमानामध्ये बदल करण्यात यावेत असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्याप्रमाणे २ मीटर × १ मीटर या मापामध्ये रुपांतर करण्यात यावे असे मा. उप आयुक्त अतिक्रमण यांनी सांगितले. २ मीटर × १ मीटर मध्ये दूध केंद्र व रस गुऱ्हाळांचे रुपांतर करणेस सर्व सभासदांनी विरोध केला. मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शनानुसार व शहरातील पदपथ लहान असल्याने अशा व्यवसायिकांच्या साईज बदलणे आवश्यक असल्याचे मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी सांगितले. | शहरातील सर्व शासकीय दूध केंद्रांचे स्टॉल व रस-गुऱ्हाळाचे स्टॉल २ मी × १ मी चे आकारमान सरसकट करण्यात यावेत, असे सर्वांनुमते चर्चेमध्ये निर्णय घेण्यात आला. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सध्याच्या नव्याने मान्य केलेल्या ५ फूट × ४ फुट मापाच्या साईज पेक्षा शहरातील अधिकृत स्टॉल परवानाधारक व्यवसायिकांच्या वाढीव मापाचे स्टॉलसाईज बाबत व वाढीव दराने शुल्काची आकारणी करणे बाबत. | हॉंगकॉंग लेन व सारसबाग येथील पुर्वीचे परवानाधारक आहेत. परंतू स्टॉलची साईज ही (५ फूट × ४ फुटापेक्षा) जास्त आहे, त्यांची स्टॉलची साईज कमी करायची असेल तर जास्त अडचण निर्माण होतील. साईज कमी करणेपेक्षा सध्याच्या साईजला वाढीव दर लावण्यात यावेत, असे ठरले. | ५ ×४ फूट या मापापेक्षा मोठे व ६ फूट × ८ फूट पर्यंतच्या या पूर्वीच्या मान्य परवानाधारक स्टॉलला नवीन अ++ ही श्रेणी निर्माण करावी व अशा व्यवसायधारकांना प्रति दिन रु. ४०० प्रमाणे परवाना शुल्क आकारण्यात यावेत. त्यापेक्षा जास्त क्षेत्र वापरण्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाया करण्यात याव्यात. तसेच लक्ष्मी रोड येथील नोंदणीकृत व्यवसायिकांना फुटपाथवर न बसवता पार्किंगचे जागेत ठराविक अंतरावर २ बाय ४ चा मापाची जागा फेरीवाला झोन तयार करुन देण्यात यावेत. |

रिमुव्हल चार्जेस बाबत पुढील महिन्यात मा. मुख्य सभेच्या पूर्वी ॲपिलेट कमिटी घेण्याचे ठरले. वरीलप्रमाणे निर्णय होऊन बैठक संपन्न झाली.

(माधव जगताप)
उप आयुक्त
अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका

11.12.17
(शीतल तेली-उगले)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

(कुणाल कुमार)
आयुक्त
पुणे महानगरपालिका

(मुक्ता टिळक)
महापौर
पुणे महानगरपालिका

प्रतः-

सर्व संबंधितांस...

पुढील योग्य ती कार्यवाहीकरीता व अमंलबजावणीकरीता...